प्रभाग समिती (ई)
नालासोपारा (प.)
ता. वसई, जि. पालघर,
पिन -४०१२०३

दुरध्वनी:- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स :- ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- ewardvvcmc@gmail.com
जा. क्र. वविशम/आरोग्य/ ८२/२०२२
दिनांक:- १३/१२/२०२२

इसारा रक्कम रु. ९७८०/-

## जाहिर दरपत्रक

याद्वारे पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिकेस खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहीम राबविणेकामी २४० लीटर क्षमतेच्या HDPE कचरा कुंडी (Dust Bin) पुरवठा करण्याकामी इच्छुक व्यक्ती, संस्था व पुरवठादार यांचेकडुन दि. २०/१२/२०२२ रोजी दु.०३.०० वाजेपर्यंत बंद पाकीटातुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कचरा कुंडी रंग | संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | हिरवा | १५० | | |
| २ | निळा | १५० | | |
| | एकुण | ३०० | | |

अटी-शर्ती

१५. पुरवठादाराने स्वतःचे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर वस्तु व सेवाकर नोंदणी (GST) क्रमांक असणे बंधनकारक राहील.
१६. मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड व आधारकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.
१७. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील.
१८. दरपत्रकदारांनी जाहिर निविदा सुचनामध्ये नमुद केलेली इसारा अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट स्वरुपात दरपत्रक सादर करतेवेळी जमा करावयाचा आहे. अन्यथा आपले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
१९. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहुन अंदाजित खर्चाच्या ३% सुरक्षा अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट मार्फत भरणा करुन ७ दिवसात करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
२०. दरपत्रकात नमुद वस्तुचे/साहित्याचे दर हे सादर करताना वाहतुक खर्च तसेच सर्व करांसहित सादर करण्यात यावे.
२१. पुरवठा करण्यात येणा-या २४० लीटर क्षमतेच्या HDPE कचराकुंडी ही BSEN-८४०-१ स्टॅन्डर्ड प्रमाणित असावे. व त्या संबंधित सर्व आवश्यक चाचणी अहवाल तसेच प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.
२२. पुरवठादाराने २४० लीटर क्षमतेच्या HDPE कचरा कुंडी या व्हील लिड तसेच टॉईंग प्रोविजन सोबत पुरवठा करणे बंधनकारक आहे.
२३. कार्यादेश दिल्यानंतर ७ दिवसाच्या आत कचराकुंडी पुरवठा करणे बंधनकारक राहील अन्यथा प्रतिदीन १०० रु. दंड आकारण्यात येईल.
२४. आपण पुरविलेल्या कचराकुंडी ६ महिन्याच्या आत पुन्हा खराब झाल्यास आपणांस सदर कचराकुंडी विनामोबदला बदलुन द्यावे लागेल.
२५. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.प्र.सहा.आयुक्त (प्रभाग समिती ई) यांना राहिल.
२६. वरिल अटींचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यात येतील.
२७. यासंबंधी दरपत्रके स्वतःचे लेटरपॅडवर बंद पाकिटातुन दिनांक २०/१२/२०२२ रोजी दु.०३.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती ई कार्यालय नालासोपारा येथे सादर करावीत.
२८. दिलेल्या दरपत्रकातील प्राप्त दरा व्यतिरिक्त इतर कोणत्याही अतिरिक्त देयकाची मागणी पुरवठादारास करता येणार नाही.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक २०/१२/२०२२ रोजी संध्या.०४.०० वाजता मा.प्र.सहा.आयुक्त (प्रभाग समिती ई) यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यात येतील.

स्थळ - प्रभाग समिती ई कार्यालय, नालासोपारा पश्चिम
दिनांक - १३/१२/२०२२

(मनोज वनमाळी)
प्र.सहा.आयुक्त
प्रभाग समिती ई नालासोपारा
वसई विरार शहर महानगरपालिका

CamScanner